ठाणे, मंगळवार दि. ११ जून २०२४ वर्ष : १३, अंक : ४४, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख
**मोदींचे नवनिर्वाचित मंत्रिमंडळ**
नरेंद्र मोदी यांनी नुकतीच तिसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे. राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात भव्यदिव्य शपथविधी सोहळा पार पडला. ....पान २ वर

वेतोशीच्या उजाड माळरानावर फुलवले नंदनवन -अशोक साळूंखे यांचे कृषी पर्यटन केंद्र बहरले ...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**
कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**
सोने ७२,५५० | चांदी ९३,५००

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



तुम्हाला माझी प्रौढी सांगत नाही, पण मी देवाचा अंश आहे. जनतेचे प्रश्न चुटकीसारखे सोडवीन आणि तुम्हाला मुक्तीही देईन.

# मोदी सरकारचे खातेवाटप जाहीर

## गृह, संरक्षण, अर्थ, परराष्ट्र, महामार्ग अन् रेल्वे मंत्रालय भाजपकडे...



### मोदींच्या मंत्रिमंडळात कुणाला कोणते मंत्रालय?

| | |
|---|---|
| अमित शाह | – गृहमंत्रालय |
| राजनाथ सिंह | – संरक्षण मंत्रालय |
| एस जयशंकर | – परराष्ट्र |
| नितीन गडकरी | – रस्ते आणि वाहतूक |
| निर्मला सीतारमन | – अर्थमंत्रालय |
| शिवराज सिंह चौहान | – कृषी मंत्रालय |
| जतीन राम | – सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय |
| पियुष गोयल | – वाणिज्य |
| अन्नपूर्णा देवी | – महिला आणि बाल विकास मंत्रालय |
| भूपेंदर यादव | – पर्यावरण |
| राम मोहन नायडू | – नागरी उड्डाण मंत्रालय |
| जेपी नड्डा | – आरोग्य मंत्रालय |
| सर्वानंद सोनोवाल | – पोर्ट शिपिंग मंत्रालय |
| सी आर पाटील | – जलशक्ती |
| किरण रिजीजू | – संसदीय कार्यमंत्री |
| धर्मेंद्र प्रधान | – शिक्षण मंत्री |
| अर्जुनराम मेघवाल | – कायदा मंत्री |
| चिराग पासवान | – क्रीडा मंत्री, अन्न प्रक्रिया मंत्री |
| प्रल्हाद जोशी | – ग्राहक कल्याण मंत्रालय |
| गिरिराज सिंह | – टेक्सटाइल मंत्रालय |
| ज्योतिरादित्य शिंदे | – सूचना आणि प्रसारण मंत्री |
| मनसुख मंडाविया | – कामगार मंत्री |
| हरदीप सिंह पुरी | – पेट्रोलियम मंत्री |
| एचडी कुमारस्वामी | – अवजड उद्योग मंत्री |
| **राज्यमंत्री** | |
| श्रीपाद नाईक | – गृहनिर्माण आणि ऊर्जा राज्यमंत्री |
| शोभा करंदाजे | – राज्यमंत्री – सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय |
| शांतनु ठाकुर | – पोर्ट शिपिंग मंत्रालय, राज्यमंत्री |
| रवनीत बिट्टू | – अल्पसंख्यांक राज्यमंत्री |

नवी दिल्ली – नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील तिसऱ्या मंत्रिमंडळाचा खातेवाटप जाहीर करण्यात आला असून अमित शाह यांच्याकडे गृहखातं कायम ठेवण्यात आलं आहे. तर शिवराज सिंह चौहान (Shivraj Singh Chouhan) यांच्याकडे कृषीमंत्रालयासोबत ग्रामीण विकास मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली आहे. सर्व महत्त्वाची खाती भाजपने वरिष्ठ मंत्र्यांकडे दिली असून कोणतीही रिस्क घेतली गेली नाही. मोदींच्या तिसऱ्या मंत्रिमंडळात नितीन गडकरी यांना पुन्हा रस्ते आणि परिवहन वाहतूक मंत्रालय, अमित शाह यांना गृह, एस जयशंकर यांना परराष्ट्र, राजनाथ सिंह यांना संरक्षण आणि अश्विनी वैष्णव यांना रेल्वेमंत्रालयाची जबाबदारी देण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (९ जून) नवीन NDA आघाडी सरकारच्या ७१ मंत्र्यांसह शपथ घेतली होती. मोदींच्या या तिसऱ्या मंत्रिमंडळात ३० कॅबिनेट मंत्री, पाच जणांकडे स्वतंत्र प्रभार आणि ३६ राज्यमंत्री आहेत. मोदी मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीनंतर भाजपने गृह मंत्रालय, संरक्षण मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालय स्वतःकडे (पान २ वर)

## सात खासदार असलेल्या शिंदे गटाला एकच राज्यमंत्रीपद

मुंबई : सात खासदार असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची स्वतंत्र कार्यभार असलेले राज्यमंत्रीपद देऊन बोळवण करण्यात आली, पण त्याच वेळी कुमारस्वामी, चिराग पासवान किंवा जीतनराम मांझी या शिंदे यांच्या पक्षापेक्षा कमी खासदार असलेल्या नेत्यांना कॅबिनेट मंत्रिपद देण्यात आले आहे. यावरून भाजपने महाराष्ट्रातील शिंदे व अजित पवार या दोन्ही मित्र पक्षांना फारसे महत्त्व दिलेले नाही हेच स्पष्ट होते. एकच खासदार असलेल्या राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला राज्यमंत्रीपद देण्याची तयारी दर्शवून अजितदादांना फारसे महत्त्व देत नाही हे दाखवून दिले. (पान २ वर)



### राज्यातील घटक पक्षांकडे दुर्लक्ष

कमी खासदार असलेल्या पक्षांना कॅबिनेट मंत्रिपदे देण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेनेला कॅबिनेट दर्जाचे मंत्रिपद देण्यात काहीच हरकत नव्हती. पण शिंदे यांनी फार आग्रह धरला नसावा किंवा भाजपने त्यांची मागणी मान्य केली नसावी. अजित पवार गटाच्या प्रफुल पटेल यांच्यासाठी कॅबिनेट मंत्रिपदाची मागणी भाजपने मान्य केली नाही. यावरून भाजप राज्यातील शिंदे व अजित पवार गट या दोन्ही मित्र पक्षांना फारसे महत्त्व देत नाही हेच पुन्हा सिद्ध झाले. त्याच वेळी राज्यातून नऊ खासदार निवडून आलेल्या भाजपने आपल्या चौघांचा मंत्रिमंडळात समावेश केला आहे.

## विधानसभेला जेवढ्या जागा शिंदे गटाला द्याल; जागावाटपाबाबत छगन भुजबळांची नवी मागणी!

मुंबई – विधानसभेला जेवढ्या जागा शिंदे गटाला मिळतील, तेवढ्याच जागा आम्हाला मिळाल्या पाहिजे, असं विधान राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी केलं आहे. तसेच आगामी विधानसभेत सर्वच जाती धर्माच्या लोकांना बरोबरीने घेऊन चालावं लागेल, असेही ते म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे विधान केलं.

**नेमकं काय म्हणाले छगन भुजबळ?**
आगामी विधानसभेत राष्ट्रवादीला ८० जागा मिळायला हव्यात, असं बोललो होतो. त्यानंतर माझ्या विरोधात अनेकजण बोलले. अशाप्रकारे काही बोलू नका, असं मला सांगण्यात आलं. मात्र, माझ्या मते जागावाटपाचं गुहाळ शेवटपर्यंत चालवून त्याचा फायदा आपल्याला होणार नाही. जागावाटपापबाबत लवकर निर्णय घ्यायला हवा, आधी जागा वाटप करून घ्यावं लागेल, त्यानंतर उमेदवार ठरवता येईल, अशी प्रतिक्रिया छगन भुजबळ यांनी दिली. भाजपा हा मोठा पक्ष आहे. मोठा भाऊ आहे. आम्ही त्यांना सांगितलं की आमचे सुद्धा ४०-४५ आमदार आहेत. (पान २ वर)

**थोडक्यात घडामोडी**

### ठाण्यात विविध ठिकाणी पाईपफुटी ... दूषित पाण्याचा पुरवठा

ठाणे – ठाण्यात विविध प्रभाग समितीच्या परिसरात नागरिकांना दूषित पाणी पुरवठा होत आहे. तर दुसरीकडे पावसाळ्याचे दिवस सुरु झाल्याने पिण्याच्या पाण्यातून रोगांचा प्रसार होण्याची शक्यता निर्माण झाल्याने नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीने दक्षतेचा उपाय म्हणून पिण्याचे पाणी गाळून आणि उकळून प्यावे, असे आवाहन ठाणे महापालिकेने केले आहे. नागरिकांनी आपल्या इमारतीमध्ये असलेल्या जमिनीखालील व इमारतीवरील पाण्याच्या टाक्या आतून स्वच्छ करून घ्याव्यात. पाण्याच्या टाकी सभोवतालची जागा स्वच्छ ठेवावी. या उपायांमुळे जलजन्य रोगांचा प्रसार टाळता येईल. त्यामुळे नागरिकांनी ही दक्षता घ्यावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

**पाणी गाळून आणि उकळून पिण्याच्या पाण्याचा वापर करावा**

NEET **वादग्रस्त निकाल प्रकरण :**

## वीस हजार विद्यार्थ्यांनी घेतली सर्वोच्च न्यायालयात धाव

मुंबई : वादग्रस्त ठरलेल्या नीट निकालाविरोधात देशातील जवळपास २० हजार विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या याचिकेत नीट पुन्हा घेण्यात यावी किंवा श्रेणी गुण पद्धत रद्द करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने घाई-गडबडीत जाहीर केलेला नीटचा निकाल वादग्रस्त ठरला आहे. या निकालाबाबत विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे कोटा येथील मोशन एज्युकेशन संस्थेने नीट परीक्षेतील गैरप्रकारांबाबत डिजिटल सत्याग्रह सुरु केला आहे. त्यात २० हजार विद्यार्थी सहभागी झाले आहेत.




या सत्याग्रहाचा एक भाग म्हणून कोटा येथील शिक्षणतज्ज्ञ नितीन विजय यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. नीट परीक्षेत ६७ विद्यार्थी हे प्रथम क्रमांकावर आहेत. नीटच्या परीक्षेत नकारात्मक गुण पद्धत असल्याने सर्व प्रश्न सोडविणाऱ्या विद्यार्थ्यांचा एक प्रश्न चुकला तरी त्याला ७२० पैकी ७१५ गुण मिळणे अपेक्षित आहे. मात्र विद्यार्थ्यांना ७१८, ७१९ गुण कसे दिले गेले, असे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांकडून उपस्थित करण्यात येत आहेत.
क्लॅटसाठी अतिरिक्त गुण देण्याच्या सूचना न्यायालयाने २०१८ मध्ये दिल्या होत्या. त्याचा हवाला एनटीएकडून देण्यात येत आहे. परंतु ती परीक्षा ऑनलाइन होती तर नीट ही ऑफलाइन आहे. (पान २ वर)

## शुल्क भरले नाही म्हणून विद्यार्थ्यांना काढले शाळेबाहेर



ठाणे – शालेय शुल्क भरण्यासाठी दोन दिवस शिल्लक असतानाही विद्यार्थ्यांना शाळेबाहेर काढण्याचा प्रकार सोमवारी ठाणे पोलीस स्कुलमध्ये घडला. शुल्क भरण्याच्या पमध्ये १२ जून शेवटची तारीख असतानाही जवळपास ११२ विद्यार्थी नाहक भरडले गेल्याचे समजताच युवासेनेने शाळेवर धडक देत शाळा प्रशासनाला जाब विचारला. तसेच, शिक्षणमंत्र्याकडे तक्रार करून कारवाईची मागणी युवासेनेच्या पूर्वेश सरनाईक यांनी केली आहे.विशेष म्हणजे या शाळेत बहुतांशी पोलीसांची मुले शिकतात.

### ठाणे पोलीस स्कूलच्या मनमानीची युवासेनेने केली शिक्षणमंत्र्यांकडे तक्रार

ठाण्यातील महागिरी येथील खारकर आळी मध्ये नामांकित ठाणे पोलीस स्कुल असुन या शाळेत बहुतांशी पोलीसांची मुले शिक्षण घेतात. सोमवारी शाळेच्या पहिल्याच दिवशी शालेय शुल्क भरले नाही, म्हणून शिक्षकांनी तब्बल ११२ विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर काढून मैदानावर बसवले. वास्तविक शाळेने दिलेल्या फी (शुल्क) भरण्याच्या पमध्ये १२ जून ही तारीख शेवटची असतानाही आज शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना बाहेर काढल्याचा आरोप पालकांनी केला. यामुळे युवासेनेच्या नेतृत्वाखाली पालकांनी शाळेभोवती गराडा घालीत जाब (पान २ वर)

## रविवारी रात्री पावसाचे धुमशान - २४ तसात ४०.६० मिमी पावसाची नोंद



### पडझाडीच्या घटना... झाड, झाडाच्या फांद्या पडल्या

ठाणे – रविवारी सकाळी पावसाची काही काळ लगबग सुरू झाली. त्यानंतर दिवसभर पाऊसाने विश्रांती घेतली. रविवारी(ता-९ जून रोजी) रात्री ११-३० वाजण्याच्या सुमारास पाऊसाने जोर धरला. पावसाने सोमवारी पहाटे ५-३० पर्यंत धुमशान घातले. पाऊसामुळे ठाण्यात झाड आणि झाडाच्या फांद्या पडण्याच्या घटना घडल्या. यात कुणीही जखमी अथवा जीवित हानी झाली नसल्याचे पालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाने माहिती दिली. १ जून ते १० जून, २०२४ या कालावधीत तब्बल ९०.३४ मिमी पाऊस पडला. तर मागील वर्षी २०२३ मध्ये याच कालावधीत पाऊस निरंक होता.
रविवारी मध्यरात्रीच्या आसपास ११-३० वाजता सुरू झालेल्या पावसाने दमदार हजेरी लावत १२-३० या एक तासात पडलेल्या पावसाने तब्बल २५.९० मिमी पाऊसाची नोंद केली त्यानंतर रात्री सोमवारी पहाटे १-३० वाजण्याच्या सुमारास ठाण्यात १.७७ मिमी पावसाची नोंद झाली. हळूहळू पाऊस ओसरत गेला आणि सातत्याने रिमझिम पावसांच्या सरी अगदी सोमवारी पहाटे ५-३० वाजण्याच्या सुमारापर्यंत सुरूच होत्या. पावसाच्या या रिमझिमि सरीने सोमवारी पहाटेच्या दरम्यान ठाण्यामध्ये पडझडीच्या घटना देखील घडल्या या घटनांमध्ये झाड पडणे, झाडाची फांदी पडणे अशा दोन घटना घडल्याची माहिती ठाणेपालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. (पान २ वर)

# विरासत ज्वेलर्स १.३० कोटींचे दागिने घेऊन फरार

## ऑफिस बॉयला माउंट आबू पर्वतातून अटक

एका ज्वेलर्स मधून दुसऱ्या ज्वेलर्समध्ये सोन्याचे दागिने नेण्यासाठी दिले. विरासत ज्वेलर्समध्ये दागिने न देता ऑफिस बॉय विशालसिंग कानसिंग राजपूत(२९) याने सेल्समनची नजर चुकवून विरासत ज्वेलर्स मधील सोन्याचे दागिने असा १८०७.६०० ग्रॅम वजनाचे दागिने घेऊन पोबारा केला. त्याची किंमत १ कोटी ३० लाख १४ हजार ७२० रुपये असल्याची माहिती देत तक्रारदार यशवंत घेवरचंद पुनमीया यांनी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी अथक प्रयत्न करीत पोलिसांना गुंगारा देणाऱ्या संशयित आरोपी विशालसिंग राजपूत याला १ कोटी १० हजार रुपयांच्या १७४५.८० ग्रॅमच्या सोन्यासह नौपाडा पोलिसांनी माउंट आबू पर्वतातून शुक्रवारी (७ जून,) रोजी अटक केली. त्याला ठाण्यात आणून न्यायालयात हजार केल्यानंतर न्यायालयाने आरोपी विशालसिंग राजपूत याला बुधवार(ता-१२ जून) पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.




**ठाणे** –नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर नौपाडा पोलिसांनी आरोपी विशालसिंग राजपूत याची चौकशी केली. तर यापूर्वी त्याने अशाच प्रकारची चोरी केल्याचा गुन्हा मुंबईच्या एल.टी.नगर पोलीस ठाण्यात दाखल असल्याची माहिती मिळाली. त्याच्या फोनवरून पोलिसांनी त्याच्या मूळ पत्ता शोधण्याचा प्रयत्न केला. आर सिमकार्ड सांगली येथील माथाडी कामगाराच्या नावावर असून फोन बंदअसलयाचे तपासात निष्पन्न झाले. नौपाडा पोलीस ठाण्याचे सपोनि मंगेश भांगे यांनी वपोनि अभय महाजन, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शहर कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु ठेवला.

### १00 पेक्षा अधिक सीसीटीव्ही तपासले.... हिंदी सिनेमासारखा प्रकार

सिम कार्डवरून आरोपीचा ठावठिकाणा आणि मूळ गावाचा पत्ता काढण्यात नौपाडा पोलिसांना मोठ्या अडचणी निर्माण होत असतानाच पोलिसांनी सराईत गुन्हेगार विशालसिंग याच्या शोधासाठी तब्बल १०० पेक्षा अधिक सीसीटीव्ही पुटेज तपासले. आपला ठावठिकाणा मिळू नये म्हणून विशालसिंग याने काम करीत असलेल्या विरासत ज्वेलर्स दुकानातील त्याचे आधारकार्ड आणि इतर कागदपत्र फरार होतानाच घेऊन गेला होता. ठाणे ते वसई प्रवासात आरोपी विशालसिंग याने ८ ते १० रिक्षा बदलल्या असल्याचे सीसीटीव्ही तपासणीत निष्पन्न झाले.

### मोबाईल ट्रकमध्ये टाकून.... अनेक राज्यातून आरोपी माउंट अबू पर्वत जंगलात

आरोपी विशालसिंग राजपूत याने एक कोटी ३० लाखाचे दागिने घेऊन पोबारा केल्यानंतर पोलिसांना गुंगारा देण्यासाठी आरोपी विशालसिंग याने अनेक युक्त्याचा तर दुसरीकडे पोलीस आपल्यापर्यंत पोहचू नये म्हणून आरोपीने वसई रोड येथून अहमदाबाद, गुजरात येथे बसने गेला होता. आरोपी हा फरार असतानाचे काळात तो जैयसलमेर, पालनपूर, जोधपूर, डिसा, बिकानेर, उदयपूर, जयपूर,माउंट आबू पर्वत, अहमदाबाद, बनसाकांटा, गुजरात, राजस्थान अशा वेगवेगळ्या ठिकाणी रात्री बसले प्रवास करून, दिवसभर एखाद्या निर्जन ठिकाणी जावून फिरत होता व पोलीसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न करीत होता.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## मोदींचे नवनिर्वाचित मंत्रिमंडळ

नरेंद्र मोदी यांनी नुकतीच तिसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे. राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात भव्यदिव्य शपथविधी सोहळा पार पडला. यावेळी मोदींच्या मंत्रिमंडळातील एकण ७२ खासदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यामध्ये कॅबिनेट आणि राज्यमंत्र्यांचाही समावेश आहे. मोदी सरकारचे खातेवाटप अद्याप झाले नसले तरी मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह आणि नितीन गडकरी यांच्याकडील जुनी खाती कायम राहतील, असा अंदाज आहे. मोदींच्या नव्या मंत्रिमंडळात मित्रपक्षांचे अनेक चेहरे दिसत आहेत. भाजपाचे हे सरकार प्रामुख्याने चंद्राबाबू नायडू यांची तेलुगू देशम पार्टी आणि नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाच्या पाठिंब्यावर अवलंबून आहे. कारण २०१४ आणि २०१९ प्रमाणे एकट्या भाजपाला बहुमत मिळालेले नाही. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने २८२ जागा जिंकल्या होत्या. तर २०१९ च्या निवडणुकीत त्यांनी ३०२ जागांवर विजय मिळवला होता. त्यामुळे भाजपाला सत्तास्थापनेसाठी इतर पक्षांवर अवलंबून राहावे लागले नव्हते. परिणामी भाजपाने तेव्हा इतर पक्षांना मोठी मंत्रिपदे दिली नव्हती. तसेच मंत्रिमंडळात इतर पक्षांमधील केवळ तीन ते चारच चेहरे होते. मात्र यावेळी भाजपाला केवळ २४५ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे सत्तास्थापनेसाठी भाजपा मित्रपक्षांच्या सहकार्यावर अवलंबून आहे. देशात नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रात सरकार स्थापन झाले आहे. भाजपाचे हे सरकार प्रामुख्याने चंद्राबाबू नायडू यांची तेलुगू देशम पार्टी आणि नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाच्या पाठिंब्यावर अवलंबून आहे. त्यामुळे या दोन पक्षांनी केंद्र सरकारमध्ये मोठी खाती मागितली आहेत. दरम्यान, मोदींच्या या तिसऱ्या मंत्रिमंडळात एकही मुस्लिम चेहरा दिसत नाही. तसेच या मंत्रिमंडळात केवळ पाच इतर अल्पसंख्याक (मुस्लिम वगळता) चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. मोदी मंत्रिमंडळाच्या कॅबिनेटमध्ये एकूण ७२ मंत्री आहेत. ज्यापैकी ३० कॅबिनेट मंत्री आहेत. तर पाच राज्यमंत्र्यांकडे स्वतंत्र कारभार आहे. उर्वरित ३७ जणांना राज्यमंत्रिपद देण्यात आले आहे. ज्या राजकीय पक्षांनी मोदी सरकारला पाठींबा दिला आहे, त्या पक्षातील काही निवडून आलेल्या सदस्यांना या मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. सदर मंत्रिमंडळात पाच अल्पसंख्यांक मंत्री असले तरी यामध्ये एकही मुस्लिम चेहरा नाही हे विशेष. या मंत्रिमंडळात रवनीतसिंग बिट्टू (शीख), हरदीपसिंग पुरी (शीख), जॉर्ज कुरियन (ख्रिश्चन), किरेन रिजिजू (बौद्ध) आणि रामदास आठवले (बौद्ध) या पाच अल्पसंख्यांक नेत्यांचा समावेश करण्यात आला आहे. रामदास आठवले हे मोदींच्या पहिल्या आणि दुसऱ्या मंत्रिमंडळात सामाजिक न्याय राज्यमंत्री होते. किरेन रिजिजू हे मोदींच्या पहिल्या मंत्रिमंडळात गृहराज्यमंत्री होते, तर दुसऱ्या मंत्रिमंडळात कायदा आणि न्यायमंत्री (कॅबिनेट) होते. जॉर्ज कुरियन हे केरळमधील भाजपाचा महत्वाचा चेहरा मानले जातात. कुरियन ना लोकसभा निवडणूक जिंकले आहेत, ना त्यांची राज्यसभेवर निवड झाली आहे. तरीदेखील त्यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. भाजपा लवकरच त्यांना राज्यसभेवर घेऊ शकते. ते यापूर्वी राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाचे उपाध्यक्ष होते. हरदीपसिंग पुरी हे मोदींच्या दुसऱ्या मंत्रिमंडळात पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस विभागाचे मंत्री होते. दरम्यान, मोदींच्या तिसऱ्या मंत्रिमंडळात एकूण सात महिलांना संधी देण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील रक्षा खडसे यांचा समावेश करण्यात आला आहे. पंतप्रधान मोदींच्या मंत्रिमंडळात शिंदे गट शिवसेना खासदार प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय राज्यमंत्रिपदाची शपथ घेतली. महाराष्ट्रातील एकूण सहा जणांची निवड केंद्रीय मंत्रिमंडळात करण्यात आली आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी, पियुष गोयल, रामदास आठवले, रक्षा खडसे, प्रतापराव जाधव, मुरलीधर मोहोळ या महाराष्ट्रातील नेत्यांचा मंत्रिमंडळात समावेश आहे. तसेच तेलगू देसम पार्टीचे नेते चंद्राबाबू नायडू व संयुक्त जनता दलाचे नेते नितीशकुमार यांना मोठे पॅकेज देण्यात आले आहे. तसेच विरोधी पक्षनेतेपदी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची निवड करण्यात आली आहे.

# पावसाचे पाणी साचणाऱ्या ठिकाणी पंपांची व्यवस्था करण्याचे निर्देश

### मान्सून कालावधीत ठाणे जिल्हा प्रशासनाने सतर्क रहावे –ना. शंभुराज देसाई

**ठाणे – पावसाळ्याच्या कालावधीत कोणतीही आपत्ती उद्भवू नये, यासाठी जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी सतर्क रहावे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार या पावसाळ्यात जिल्ह्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस अपेक्षित आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने पाणी साचणे, नाले तुंबणे आदी ठिकाणे शोधून तेथे उपाययोजना कराव्यात, अशा सूचना उत्पादन शुल्क मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी आज दिले.**





पालकमंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली आज मान्सूनपूर्व आढावा बैठक दूरदृश्यप्रणालीद्वारे आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातून जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, तहसीलदार संजय भोसले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ सहभागी झाले होते. तसेच ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांच्यासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच मिरा-भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी, कल्याण डोंबिवली या महापालिकांचे आयुक्त, अंबरनाथ व बदलापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, ठाणे व नवी मुंबई पोलीस आयुक्त, रेल्वे, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, एसटी महामंडळ, पशुसंवर्धन, कृषी, जलसंपदा आदी विभागाचे अधिकारी यावेळी ऑनलाईन उपस्थित होते.

### साथरोगाला आळा घालण्यासाठी पुरेसा औषध साठा ठेवा

जिल्ह्यातील मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेऊन श्री. देसाई म्हणाले की, पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागात नाले तुंबणे, पाणी साचणे असे प्रकार होतात. अशा ठिकाणी महानगरपालिका, नगर पालिका यांनी पाणी साचणाऱ्या ठिकाणी पाण्याचा उपसा करण्यासाठी पंपांची व्यवस्था करावी. महापालिका, नगरपरिषदांनी आतापर्यंत नालेसफाई पूर्ण केली आहे. परंतु काही वेळेस एकदम येणाऱ्या पावसामुळे अनेकवेळेस गटारीमध्ये घाण साचून नाले तुंबतात. या पाण्यामुळे पूर परिस्थिती निर्माण होवून नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागू शकते. नाल्यांच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष ठेवावे.

धोकादायक इमारतींमधील नागरिकांचे तात्पुरते स्थलांतर करण्याचे काम पडल्यास. ही तात्पुरती निवारा केंद्र सुविधांनी सज्ज असावी. या ठिकाणी पिण्याचे पाणी, वीजेची सुविधा असावी, अशा सूचनाही मंत्री श्री. देसाई यांनी दिल्या.

मंत्री श्री. देसाई म्हणाले, नागरी व ग्रामीण भागातील रूग्णालयांमध्ये औषधसाठा पुरेसा उपलब्ध करून ठेवावा. साथरोग नियंत्रणासाठी आरोग्य विभागाने सतर्क असावे. साथरोगावरील औषधांची उपलब्धता निश्चित करावी. गृह विभागाने प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये 'ईमरजन्सी हेल्पलाईन क्रमांका'ची सुविधा सुरू करावी. पूर किंवा पावसाशी निगडीत घटनेशी कॉल आल्यास, तात्काळ संबंधित यंत्रणेला माहिती देवून गरजू नागरिकांना मदत द्यावी.

### जिल्ह्यातील यंत्रणा सज्ज – जिल्हाधिकारी

यावेळी जिल्हाधिकारी श्री. शिनगारे यांनी मान्सूनपूर्व तयारीची माहिती दिली. आपत्त्कालीन परिस्थितीत मदत पोचविण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत संबंधित गावांना पुरेशा प्रमाणात साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. नालेसफाई, घनकचरा, पाणी पुरवठा, साथरोग आदीसंदर्भात संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. शोध व बचाव कार्यासाठी तहसीलनिहाय पथक तयार करण्यात आले असून त्यांना आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हास्तरावर आपत्ती नियंत्रण कक्ष कार्यरत करण्यात आले असून तेथे हॉटलाईन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आपत्ती निवारण आराखड्याचे काम प्रगतीपथावर असून लवकरच तो पूर्णत्वास आणण्यात येणार आहे. जिल्ह्यात दहा ठिकाणी बहुद्देशीय निवारा केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. दरडप्रवण क्षेत्रातील कामांना मंजुरी देण्यात आली आहे. तसेच १५२ पूरप्रवण गावांमध्ये उपाय योजना करण्याचे निर्देश संबंधित प्रशासनास देण्यात आले आहेत. धोकादायक पूल, खड्डेमय रस्त्यांची दुरुस्ती करण्याच्या सूचना संबंधित विभागाना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती यावेळी श्री. शिनगारे यांनी दिली.

## टाकेडे ग्रामविकास मंडळ मुंबई (रजि.) आणि टाकेडे ग्रामविकास मंडळ ग्रामीण यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन

मंडणगड – जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन टाकेडे ग्रामविकास मंडळ मुंबई (रजि.) आणि टाकेडे ग्रामविकास मंडळ ग्रामीण यांच्या संयुक्त विद्यमाने ९ जुन २०२४ रोजी टाकेडे येथे वृक्षारोपणकार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमीत्ताने गावातील विठ्ठल रुखमाई मंदिरात आयोजीत स्वागत व सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्षपद श्री चंद्रकांत वामन शिंदे यांनी भुषविले. कार्यक्रमास उपस्थित पाहुण्यांचे स्वागत अनंतराव शिंदे व ग्रामस्थांनी केले. कार्यक्रमास माजी सभापती अमिता शिंदे, अस्मिता केंद्रे, अनंत केंद्रे, दयानंद येसरे, वनपाल अनिल दळवी, ग्रामसेवक श्री. पालवे, पोलीस पाटील दिनेश जाधव, कृषीसहाय्यक श्री. नागरगोजे, अंगणवाडी सेविका अमिता गणवे, मुंबई मंडळाचे अध्यक्ष श्री चंद्रकांत शिंदे, सचिव श्री राकेश चाळके, खजिनदार श्री सतिश पाटेकर, माजी अध्यक्ष श्री सुरेश पाटेकर, श्री शांताराम साळुंखे, सदस्य दिनेश चाळके, वैभव पाटेकर, नितीन पाटेकर, अनंत भाई शेलार, सुर्यकांत पवार, महेश आंब्रे, मंगेश चाळके, सुदेश पवार, जयवंत शिंदे, कृष्णकांत शिंदे, अमेय शिंदे, अनुज कदम, प्रशांत कदम, बबन चाळके, सार्थक पवार, दिनेश आंब्रे, सुनिल (बाळा) शेलार, अजित कदम, हर्षद जाधव आदी मुंबई मंडळातील मान्यवर उपस्थित होते. त्याचप्रमाणे ग्रामविकास मंडळ ग्रामीणचे अध्यक्ष श्री सिताराम सुर्वे, सचिव श्री सुनिल पाटेकर , खजिनदार श्री अनिल गणवे आणि त्याची संपुर्ण कार्यकारणी उपस्थित होती तसेच उत्कर्ष महिला मंडळ अध्यक्षा सौ प्रियांका साळुंखे, सचिव सौ संजिवनी चाळके, खजिनदार माधुरी गणवे आणि त्याची संपूर्ण कार्यकारणी उपस्थित होती तसेच श्री महालक्ष्मी टाकेडे महिला मंडळ मुंबई च्या सल्लागार सौ रेश्मा शेलार आणि सौ रोहिणी शिंदे व सभासद सदस्या सौ निधी पाटेकर आणि संध्या पाटेकर उपस्थित होत्या. यावेळी बोलताना श्री.अनंत शिंदे यांनी वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभुमीवर टाकेडे ग्रामस्थ खारीचा वाटा उचलून गावाच्या हद्दीत




पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेत असल्याचे सांगीतले. यावेळी वनपाल श्री. दळवी, ग्रामसेवक श्री. पालवे कृषी विभागाचे श्री. नागरगोजे माजी सभापती अमिता शिंदे, अस्मिता केंद्रे यांनी कृषी वनविभाग व जिल्हापरिषदेच्या विविध योजनांची माहीती देत वृक्षलागवडी कशी करावी माती परिक्षणाची आवश्यकता या विषयावर ग्रामस्थांना माहीती दिली. वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे या तुकोबांच्या अभांगाला साजेसे सुत्य उपक्रम राबवत ग्रामस्थांनी यावर्षीही पर्यावरणाचे रक्षणासाठी उपक्रम राबवून पर्यावरण दिन साजरा करत तालुक्यापुढे आदर्श निर्माण केला

# ठाणे महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम घोटाळ्याचे आयुक्त कार्यालय लाभार्थी नसेल तर तात्काळ कारवाई करा...

### ठाकरेंच्या शिवसेनेचे संजय घाडीगावकर यांचे आयुक्तांना प्रत्यक्ष भेटून पत्र

**ठाणे:–ठाण्यातील अनअधिकृत बांधकामाच्या महाघोटाळ्यात महापालिका आयुक्त लाभार्थी नसतील तर ही अनधिकृत इमारतीची बांधकामे स्वत: उपस्थिति देवून पूर्णपणे तात्काळ तोडावी अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी आयुक्तांची भेट घेऊन केली आहे.**



याबाबतचे एक पत्र संजय घाडीगावकर यांनी पालिका आयुक्तांना सुपूर्द केले असून यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, मुख्य सचिव- महाराष्ट्र राज्य आणि महापालिका आयुक्त म्हणून आपण दिलेल्या आदेशाला प्रशासनाकडून दखल घेण्यात आलेली नसल्याची ८० चालू बांधकामां ची उदाहरणे मी आपणास देत आहे. प्रशासनाच्या आशिर्वादाने काही राजकीय नेते, भू-माफिया यांच्या अभद्र युतीने त्यांच्या हस्तकाकडून अन अधिकृत बांधकामे निर्माण करीत असून याबद्दल सबंधित पद- निर्देशित अधिकारी आणि उप आयुक्त, अतिक्रमण - मुख्यालय यांचेवर जबाबदारी निश्चिती देण्यात यावी. आणि त्यांच्याकडून २४ तासात सत्य परिस्थितिजन्य अहवाल घेवुन त्यानुसार सबंधित कारवाई त्याच्या तार्किक परिनितिला नेण्यासाठी दिवा, कळवा ,मुंब्रा, माजीवड़ा मानपाडा, उथळसर प्रभाग समिती क्षेत्रात निर्माणाधीन असलेली सर्व अन अधिकृत इमारतीची बांधकामे स्वत: उपस्थिति देवून पूर्णपणे निष्कासित करण्यात यावी, अशी विनंती त्यांनी या पत्रात केली आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात निवडणुक निधी जमा करण्यासाठी झालेली बांधकामे आणि व्यक्तिश आपले प्रशासनच पावसाळ्यात होणाऱ्या पूरस्थितिस जबाबदार असणार आहेत, असा इशाराही त्यांनी या पत्रातून दिला आहे.

ठाणे महापालिका प्रशासनाने दिनांक १२-४-२०२४ ,दि.३-५-२०२४,दि.९-५-२०२४ दि.१०-५-२०२४ दि.१३-५-२०२४ रोजीच्या पत्राची / ई-मेल तक्रारीची जाणीवपूर्वक दखल घेतलेली नसल्याने खालील प्रभाग समिती क्षेत्रात अन अधिकृत इमारती , बंगले, बैठ्या चाळी , दुकाने - गोडाउन, ही अशी अन अधिकृत बांधकामे यांची दिवस रात्र बांधकामे चालु आहेत. उपरोक्त भ्रष्टाचारात आपण आणि आपले प्रशासन लाभार्थी नसतील तर सबंधित पद- निर्देशित अधिकारी तथा सहा आयुक्त, अभय देणारे प्रभारी उप आयुक्त यांचे निलंबन अद्याप का झालेले नाही? असा सवाल या निमित्ताने घाडीगावकर यांनी उपस्थित केला आहे.

जर आपणास ही अनधिकृत बांधकामे दिसत नसतील तर माझे समवेत ठाणे महापालिका क्षेत्रात एक दिवस पाहणी मोहिम घ्यावी आपणास अन अधिकृत बांधकामांच्या जत्रेचे दर्शन नक्की होईल याची गॅरंटी देतो , आणि ही पाहणी फसवी नक्कीच नसेल याची आपली खात्री होईल असे घाडीगावकर यांनी या पत्रात म्हटले आहे.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
वेस्ट व्हयू, तिसरा मजला,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) ४००६०१.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक :-ACC III/७१४/२४
सार्वजनिक न्यासावे नांव व नोंदणी क्रमांक :- सी. बी. डी. लघुउद्योजक व फेरीवाला सेवाभावी संस्था एफ ३०३०४
अंकमानी संस्था अर्जदार : श्री. मनमोहन जनवेद तोमर

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त - २, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून / विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.
१) श्री. श्रावण गोविंद वाघमारे
२) श्री. राजकुमार साधू शिंदे
३) श्री. प्रभाकर जिजाबा कौदरे
४) श्री. मारुती महादेव नारकर

तसेच खालील नमूद विश्वस्तांच्या कार्यकारी मंडळामध्ये / विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आले आहे.
१) श्री. ब्रिजमोहन सिंह तोमर
२) श्री. पांडुरंग सुर्यकांत मगडवार
३) श्री. बाळू नागेश्वर सागर
४) सी. जसमीत मनमोहन तोमर
५) श्री. सुखजित सिंग भाब्रा
६) श्री. अशोक काशिनाथ पाटील

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०६/०६/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे.

## विधान परिषदेच्या शिक्षक – पदवीधर मतदारसंघासाठीची निवडणूक

मुंबई - भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर केली आहे. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांकरिता निवडणूक होत असून बुधवार, २६ जून २०२४ रोजी मतदान होणार आहे. या निवडणूकीत छाननी नंतर एकूण ८८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

या निवडणुकीकरिता उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जांची छाननी आज सोमवार, १० जून २०२४ रोजी करण्यात आली आहे.यामध्ये मुंबई पदवीधर मतदारसंघात १०, कोकण विभाग पदवीधर २५, नाशिक विभाग शिक्षक ३६ तर मुंबई शिक्षक मतदारसंघात १७ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

### छाननी नंतर एकूण ८८ उमेदवारांचे अर्ज वैध

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत बुधवार, १२ जून २०२४ अशी आहे. बुधवार २६ जून २०२४ रोजी चारही मतदारसंघाकरिता मतदान होईल. सोमवार १ जुलै २०२४ रोजी मतमोजणी होईल. ही संपूर्ण प्रक्रिया दिनांक ५ जूलै २०२४ रोजी पूर्ण होणार आहे.

## विधानसभेला जेवढ्या जागा शिंदे गटाला द्याल; जागावाटपाबाबत छगन भुजबळांची नवी मागणी!

**(पान १ वरून)** जवळपास तेवढचे आमदार शिंदे गटाचे सुद्धा आहेत. त्यामुळे शिंदेंना जेवढ्या जागा मिळतील, तेवढ्या जागा आम्हाला सुद्धा मिळाल्या पाहिजे. आता शिंदेंचे खासदार जास्त निवडून आलेत. त्यामुळे त्यांना जास्त जागा मिळायला हव्यात, असं कोणी म्हणू नये. आपण सर्वांनी मिळून ही निवडणूक लढवायला हवी, आपण एक होऊन निवडणूक लढवली तर विधानसभेत सत्ता स्थापन करू शकू, असेही ते म्हणाले.

विधानसभेत उमेदवारी देताना आपल्याला सर्व समाजाचा विचार करावा लागेल. दलित आणि आदिवसींच्या जागा राखीव आहेत. मात्र, इतरांना आपल्याला बरोबर घ्यावं लागेल. हा मोठा वर्ग आहे. मुस्लीमांना आपण पाठिंबा दिला पाहिजे. अशा वेळी धर्माचा विचार करून चालणार नाही. आपण त्यांच्याबरोबर आहोत, असा विश्वास त्यांना दिला पाहिजे, असंही भुजबळ यांनी सांगितलं.

## वीस हजार विद्यार्थ्यांनी घेतली सर्वोच्च न्यायालयात धाव

**(पान १ वरून)** त्या सूचनेचा दाखला देत ग्रेस मार्क्स देणे कितपत योग्य आहे? पेपर उशिरा वाटला तर जास्त वेळ देता आला असता, गुण का दिले? परिपत्रक, निकाल पत्रात ग्रेस गुणांच्या तरतुदीचा उल्लेख नाही. तक्रार करणाऱ्यांनाच ग्रेस गुण मिळाले आहेत. ज्या मुलांनी तक्रार केली नाही त्यांचा काय दोष? एनटीएने १४ जून रोजी निकालाची संभाव्य तारीख जाहीर केली असताना १० दिवस आधीच निकाल जाहीर करण्याचे कारण काय? असे अनेक प्रश्न याचिकेत उपस्थित करण्यात आले आहेत. वेळ कमी पडल्यास अतिरिक्त गुण देण्याबाबत एनटीएकडे कोणताही आधार नसल्याचा मुद्दाही नितीन विजय यांनी याचिकेत उपस्थित केला आहे.

## रविवारी रात्री पावसाचे धुमशान – २४ तसात ४०.६० मिमी पाऊसाची नोंद

**(पान १ वरून)** मागील २४ तासात ३ झाडे पडली, तर एक झाडाची फांदी पडल्याची घटना घडली. रविवारी सकाळी १०-३० वाजण्याच्या सुमारास श्रीनाथ प्लाझा जवळ, दत्त मंदिरच्या बाजूला, धोबी आळी, चरई, ठाणे (प.) या ठिकाणी झाड पडले. सोमवारी पहाटे ६-५४ वाजता मढवी हाऊस जवळ, टी.जे.एस.बी. बँकेच्या बाजूला, पादुका फुटवेअरच्या समोर, राम मारुती रोड, नौपाडा, ठाणे (प.) या ठिकाणी रस्त्यावरती झाडाची फांदी पडली. तर सोमवारी सकाळी ७-३५ वाजण्याच्या सुमारास ठाण्याच्या विठ्ठल मंदिर जवळ, आनंद भोजनच्या बाजूला, ब्राह्मण सेवा हॉलच्या समोर, मार्केट रोड, ठाणे (प.) या ठिकाणी एक मोठे जांभळाचे झाड विठ्ठल मंदिराच्या शेडवरती झाड पडले. या घटनांमध्ये कुठलीही जीवितहानी झाले नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

## शुल्क भरले नाही म्हणून विद्यार्थ्यांना काढले शाळेबाहेर

**(पान १ वरून)** विचारला तरीही शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच व्यवस्थापक यावर कोणतेही भाष्य करण्यास तयार नव्हते. त्यामुळे या शाळेच्या विरोधात आणि प्रिन्सिपलच्या विरोधात मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे तक्रार करण्यात येणार असल्याचे युवासेनेचे पूर्वेश सरनाईक यांना सांगितले. या प्रकरणी शाळा व्यवस्थापनाची बाजू विचारण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी बोलण्यास नकार दिला.

## विरासत ज्वेलर्स १.३० कोटीचे दागिने घेऊन फरार

**(पान १ वरून) नौपाडा पोलिसांचा चाणाक्षपणा....आरोपीचा मिळवला ठावठिकाणा** – आरोपीने ठावठिकाणा मिळू नये म्हणून पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी वापरातील फिर्यादी आणि मित्रांना माहिती असलेला मोबाईल मुंबईकडे जाणाऱ्या ट्रकमध्ये टाकला. त्यानंतर विविध राज्यातून स्थलांतर करीत प्रवास करीत होता. नौपाडा पोलिसांनी तांत्रिक पद्धतीचा अवलंब करीत आरोपीच्या नातेवाईक, पत्नी व मित्र यांचे हालचालींवर लक्ष ठेवुन आरोपीचा शोध घेत असताना आरोपी रविवारी(ता-२ जून) रोजी माउंट आबू पर्वत, राजस्थान येथे असल्याची पोलीसांना माहीती मिळाली. आरोपी विशालसिंग हा दिवसभर जंगलात टाईमपास करून झोप पूर्ण करण्यासाठी मन मानेल त्या ठिकाणी बसने झोपून प्रवास करायचा अखेर पोलिसांनी त्याची रेकी करून सावज टिपले.

**अबू पर्वताच्या जंगलात पाठलाग करून सावज टिपले** – राज्यस्थानच्या माउंट अबू जंगलात दाब धरून रात्री बसने प्रवास करणाऱ्या विशालसिंग याच्या नातेवाईकांच्या माध्यमातून त्याचा कार्यरत असलेला मोबाईल मिळाल्यानंतर पोलिसांचे काम सोपे झाले. त्यांनी एक आठवडा रेकी केली. आरोपी विशालसिंग हा अटकेपूर्वी एक दिवस अगोदर उदयपूर येथून माउंट अबू येथे आला. तो जंगलात लपलेला असतानाच पोलीस पोहचले. पोलिसांना बघताच आरोपी विशालसिंग हा पळून जाऊ लागला आणि पोलिसांनी पाठलाग करून त्याला अटक केली. तो मूळचा ओढवा, ता. दांतीवडा, जिल्हा बनासकांटा राज्य गुजरात येथील आहे. पोलिसांनी त्याला शुक्रवार (ता-७ जून) रोजी दुपारी २-१५ वाजण्याच्या सुमारास अटक केली. त्याला ठाण्यात आणून ठाणे न्यायालयात हजार केल्यानंतर न्यायालयाने विशालसिंग राजपूत याला बुधवार (ता-१२ जून) पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. नौपाडा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## मोदी सरकारचे खातेवाटप जाहीर

**(पान १ वरून)** ठेवल्याचं स्पष्ट झालं आहे. गेल्या मंत्रिमंडळात नारायण राणे यांच्याकडे असलेल्या सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालयाची जबाबदारी आता बिहारच्या जितन राम मांझी यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

## सात खासदार असलेल्या शिंदे गटाला एकच राज्यमंत्रीपद

**(पान १ वरून)** राज्यात भाजपला सत्तेत आणण्यासाठी महत्वाची कामगिरी बजावलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची भाजपने केवळ एक राज्यमंत्रीपद (स्वतंत्र कार्यभार) देऊन बोळवण केली आहे. तेलुगू देसमचे १६ तर संयुक्त जनता दलाचे १२ खासदार असल्याने या पक्षांना मंत्रिमंडळात प्रत्येकी दोन मंत्रिपदे देण्यात आली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या शिवसेना शिंदे गटाचे सात खासदार असूनही केवळ एक राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) देण्यात आले आहे. पाच खासदार असलेले चिराग पासवान, तीन खासदार असलेले संयुक्त जनता दलाचे कुमारस्वामी किंवा केवळ एकच खासदार असलेल्या बिहारमधील हिंदुस्थानी अवामी मोर्चाचे जीनतराम मांझी यांची कॅनिबेट मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली.

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

■ पदाचे नाव : विद्युत सहाय्यक
शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
■ वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./ अनाथ: १२५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## हिंदुस्तान एरोनॉटिक्स लि.

■ पदाचे नाव तपशील:
१ डिप्लोमा टेक्निशियन (Mechanical) २९
२ डिप्लोमा टेक्निशियन (Electrical/Electronics/Instrumentation) १७
३ ऑपरेटर (Fitter) १०५
४ ऑपरेटर (Electrician) २६
५ ऑपरेटर (Machinist) ०२
६ ऑपरेटर (Welder) ०१
७ ऑपरेटर (Sheet Metal Worker) ०२
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१ २: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical/Electrical/Electronics/Instrumentation)
पद क्र.३ ते ७: ITI/N-C /NCTVT (Fitter/Electrician/Machinist/Welder/Sheet Metal Worker)
■ वयाची अट: ०१ मे २०२४ रोजी १८ ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
■ फी : फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १३ जून २०२४ (११:५९ PM²)
■ अधिकृत वेबसाईट: https://hal-india.co.in/

## सीमा सुरक्षा दल

### सीमा सुरक्षा दल

■ combatised/group_B/2024 1 इंस्पेक्टर (Librarian)
■ combatised/group_B_C/2024 2 सब इंस्पेक्टर (Staff Nurse)
■ असिस्टंट सब इंस्पेक्टर (Lab Tech)
■ असिस्टंट सब इंस्पेक्टर (Physiotherapist)
■ SMT_WKSP/२०२४ सब इंस्पेक्टर (Vehicle Mechanic)
■ कॉन्स्टेबल (OTRP)
■ कॉन्स्टेबल (SKT)
■ कॉन्स्टेबल (Fitter)
■ कॉन्स्टेबल (Carpenter)
■ कॉन्स्टेबल (Auto Elect)
■ कॉन्स्टेबल (Veh Mech)
■ कॉन्स्टेबल (BSTS)
■ कॉन्स्टेबल (Upholster)
Veterinary_Staff/2024 हेड कॉन्स्टेबल (Veterinary)
■ हेड कॉन्स्टेबल (Kennelman)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: ग्रंथालय विज्ञान किंवा ग्रंथालय आणि माहिती विज्ञान या विषयात पदवी.
पद क्र.२: (१) १२वी उत्तीर्ण (२) जनरल नर्सिंग डिप्लोमा/पदवी
पद क्र.३: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) डीएमएलटी
पद क्र.४: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) फिजियोथेरपिस्ट डिप्लोमा/पदवी (३) ०६ महिने अनुभव
पद क्र.५: ऑटोमोबाईल/ मेकॅनिकल डिप्लोमा/पदवी
पद क्र.६ ते १३: (१) १०वी उत्तीर्ण (२) संबंधित ट्रेड मध्ये
पद क्र.१४: (१) १२वी उत्तीर्ण (२) व्हेटर्नरी स्टॉक असिस्टंट कोर्स (३) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.१५: (१) १०वी उत्तीर्ण (२) शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालय किंवा दवाखाना किंवा पशुवैद्यकीय महाविद्यालय किंवा शासकीय पशु फार्म येथून जनावरे हाताळण्याचा दोन वर्षांचा अनुभव.
■ वयाची अट: १७ जून २०२४ रोजी, /: ०५ वर्षे सूट, : ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ५: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.२: २१ ते ३० वर्षे
पद क्र.३: १८ ते २५ वर्षे
पद क्र.४: २० ते २७ वर्षे
पद क्र.६ ते १५: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी /: फी नाही
पद क्र.1,2, 5, 14 & 15: General/OBC/EWS: ₹200/-
पद क्र..3,4, 6 ते13: General/OBC/EWS: ₹100/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.bsf.gov.in/

सभासद व्हा
....आणि
दररोज नोकऱ्यांची माहिती आपल्या मोबाईलवर थेट मिळवा
वार्षिक वर्गणी फक्त 450/-
संपर्क : 9892305888

## इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र

■ पदाचे नाव :
१ सायंटिफिक ऑफिसर/E
२ सायंटिफिक ऑफिसर/D
३ सायंटिफिक ऑफिसर/C
४ टेक्निकल ऑफिसर
५ सायंटिफिक असिस्टंट/C
६ नर्स/-
७ सायंटिफिक असिस्टंट/B
८ फार्मासिस्ट
९ टेक्निशियन
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) M.B.B.S. (ii) M.S./M.D. (iii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) MBBS (ii) M.D.S./B.D.S./M.D./M.S. (iii) ०३/०५ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) M.B.B.S. (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.४: ५०% गुणांसह फिजिओथेरपी P.G.पदवी
पद क्र.५: ५०% गुणांसह MSW
पद क्र.६: B.Sc. (Nursing) किंवा १२वी उत्तीर्ण + -NM²
पद क्र.७: ६०% गुणांसह B.Sc. (Medical Lab Technology) किंवा ६०% गुणांसह PG DMLT किंवा B.Sc. (Radiography) किंवा ५०% गुणांसह B.Sc. + रेडिओग्राफी डिप्लोमा किंवा ६०% गुणांसह B.Sc. (Nuclear Medicine Technology) + ५०% गुणांसह B.Sc. + DMRIT/DNMT/DFIT
पद क्र.८: (i) १२वी उत्तीर्ण (ii) फार्मसी डिप्लोमा
पद क्र.९: (i) ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Science). (ii) Plaster / Orthopaedic Technician/ ECG Technician/ Cardio Sonography / Echo Technician प्रमाणपत्र
■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते ५० वर्षे
पद क्र.२: १८ ते ४० वर्षे
पद क्र.३ ते ७: १८ ते ३५ वर्षे
पद क्र.८ ९: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: कल्पाक्कम (तमिळनाडु)
■ फी : SC/ST/महिला: फी नाही
पद क्र.१ ते ३: ३००/-
पद क्र.४ ते ६: २००/-
पद क्र.८ ९: १००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.igcar.gov.in/

**सातारा जिल्ह्यातील पाटण येथील कोयना प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या अशोक रामचंद्र साळुंखे यांनी महसूल व पाटबंधारे खात्यात ३५ वर्षे सेवा केल्यानंतर स्वेच्छा सेवानिवृत्ती घेऊन शेती फलोद्यान व्यवसायात पदार्पण करण्याचा निर्णय घेतला. रत्नागिरी तालुक्यातील वेतोशी या गावी ५४ एकर कातळ जमीन खरेदी केली. कठोर मेहनत घेऊन केंद्र शासनाच्या अमृत सरोवर योजनेतून सिंचनाचे प्रश्न सोडविले आणि शेती फलोद्यानातून उजाड माळरानावर नंदनवन फुलवण्याची किमया केली. दुसऱ्या टप्प्यात कृषी पर्यटनावर भर देऊन शिवार कृषी पर्यटन केंद्र सुरू केले. कोकणातील एका उजाड माळरानावर कृषी आणि पूरक उद्योगातून समृद्धी आणणाऱ्या या अशोक साळुंखे या किमयागाराची ही यशोगाथा.**

पाण्याचा साठा झाला. शेती फलोत्पादनासाठी सिंचनाची सुविधा निर्माण झाली. हे पाणी वापरण्यासाठी साळुंखे यांनी सौरऊर्जा प्रकल्प उभारून विना खर्च नैसर्गिक वीज वापरासाठी कृषी पंप बसवून घेतले. तसेच ठिबक सिंचन यंत्रणा बसवून घेतले शेती बागायतदारांसाठी वर्षभर सिंचन सुविधा सुरू झाली.

### कृषीपुरक उद्योगांची जोड

अशोक साळुंखे यांनी आपल्या ५४ एकर पडीक जमिनी पैकी १९ एकर क्षेत्रावर आंबा, काजू, नारळ, सुपारी, मिरी, भाजीपाला पिकांची लागवड कोकणासाठी नवख्या असलेल्या ड्रॅगन फ्रुट या फळझाडांची लागवडही यशस्वी केली. जुन्या आंबा,काजू लागवडीचे पुनरूज्जीवन झाल्याने त्यांना दरवर्षी ५ हजार टन आंबा आणि एक टन काजूचे उत्पादन मिळते. शेतीला पूरक म्हणून त्यांनी चाळीस हजार पक्ष्यांचा कुक्कुटपालन व्यवसाय सुरू केला. पक्ष्यांच्या खाद्यासाठी पोल्ट्री खाद्य युनिट सुरू केले. शेती बागायतीसाठी रासायनिक खत न वापरता सेंद्रिय खतासाठी गांडूळ खत निर्मिती युनिट उभारून ३५ टन गांडूळ खताची निर्मिती केली. शेणखताचाही वापर सुरू केला. याखेरीज बकरी पालन, खेकडा पालन यासारखे पूरक उद्योगही सुरू करून आर्थिक उत्पादनांचे पर्याय निर्माण केले.

### प्रत्येक योजनेचे शासकीय अनुदान


साळुंखे यांनी अमृत सरोवर योजनेतून बाधलेले शेततलावामध्ये गोड्या पाण्यातील मत्स्यसंवर्धन सुरू केले आणि त्यातून त्यांना हंगामात साडेसहा ते सात टन मस्य उत्पादन मिळते. त्यातील काही मासे बाजारपेठेत पाठवून उर्वरित मत्सउत्पादन फिश मिल मोठ्या उद्योगांना पुरविले जाते. याशिवाय शासकीय पर्यटनाकडे वळवून आपल्या ङ्गशिवारफ या शेतीफार्म कृषी पर्यटन केंद्र उभारले आहे. त्यासाठी त्यांनी कोकण कृषी विद्यापीठ मत्स्य महाविद्यालय, शासनाचा कृषी विभाग, मत्स्य उद्योग विभाग अशा विविध विभागाकडून आवश्यक प्रशिक्षण घेतले आहे. अमृत सरोवर योजनेच्या तलावामध्ये आगामी काळात येथे येणाऱ्या पर्यटकांसाठी बोटिंगची सुविधा उपलब्ध करून देण्याचा त्यांचा संकल्प आहे.

### एकात्मिक शेतीचा आदर्श प्रकल्प

साळुंखे यांचा शिवार फार्म हाऊस आणि कृषी पर्यटन केंद्र कोकणातील एकात्मिक शेतीचा आदर्श प्रकल्प म्हणून नावारूपाला येत आहे. येथे शाळा महाविद्यालयांच्या शैक्षणिक सहली, विविध अभ्यासक्रमात प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभ्यास गट आणि आणि पर्यटकांच्या सहली सातत्याने वाढत आहेत. शासनाच्या विविध विविध खात्यांचे वरिष्ठ अधिकारी लोकप्रतिनिधीं या केंद्राला नेहमीच भेट देत असतात. वर्षभरात हे कृषी पर्यटन केंद्र विविध सुविधानी सुसज्ज होईल असे त्यांनी सांगितले.

### भारतीय तटरक्षक दलाचे उपक्रम

या केंद्रात भारतीय तटरक्षक दलामार्फत अमृत सरोवर येथे भारतीय स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आणि अन्य शासकीय दिनाच्या दिवशी ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न होतो. योग दिन आणि शैक्षणिक संस्था अभ्यास दौरेही तटरक्षक दल आयोजित करीत असते.
प्रगतिशील शेतकरी अशोक साळुंखे यांच्या या कृषी पर्यटन प्रकल्पात त्यांची सुविद्य पत्नी सौ. अनुपमा, परदेशात मरीन इंजिनीअर्सचे शिक्षण घेतलेला मोठा चिरंजीव पराग आणि बी. टेक., ग्रीकल्चर, एम बी ए (फायनान्स) एल एल बी असे विद्याभूषित दुसरे चिरंजीव तुषार हे नेहमीच सहकार्य करीत असतात. या प्रकल्पात तीन कुटुंबांना कायमस्वरूपी रोजगार तर गावातील शेकडो लोकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे.



प्रेरणादायी यशोगाथा

# वेतोशीच्या उजाड माळरानावर फुलवले नंदनवन

## अशोक साळूंखे यांचे कृषी पर्यटन केंद्र बहरले

रत्नागिरी तालुक्यातील रत्नागिरी पासून अवघ्या सतरा किलोमीटर अंतरावरील शिळ- करबुडे या आडवळणी मार्गावरील वेतशी हे गाव. या गावावरून जाताना दुतर्फा शासनाच्या १००टक्के अनुदानातून रोजगार हमी योजनेअंतर्गत फलोत्पादन योजनेतून उभारलेल्या आंबा-काजूच्या बागा दृष्टीस पडतात. याच वेतोशी गावात प्रगतीशील शेतकरी श्री. अशोक रामचंद्र साळुंखे यांनी काही वर्षांपूर्वी ५४ एकर कातळ जमीन खरेदी केली. उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या कातळावर काय पिकणार? असा प्रश्न कुणालाही पडावा. मात्र साळुंखे यांनी या जमिनीत जमेल तशी आंबा काजूची लागवड करून केलेली लागवड दूरवरून पाणी आणून ती जगविण्याचा प्रयत्न केला अशातच त्यांना नव्या आशेचा किरण दिसला.





### अमृत सरोवर योजनेतून शेततळे

सन २०१९ मध्ये त्यांच्या मदतीला आजादी का अमृत महोत्सव निमित्त राष्ट्रीय फलोत्पादन मिशन अंतर्गत अमृत सरोवर म्हणजेच सामुहिक शेततळे योजना त्यांच्या मदतीला धावून आली. साळुंखे यांनी दिनांक ५ जुलै २०१९ रोजी केंद्र शासनाने मंजूर केलेल्या योजनेतून अमृत सरोवर शेत तळ्याच्या खोद कामास प्रारंभ करून दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी शेततळ्याची उभारणी पूर्ण केली. ५२ मीटर लांब आणि ५२ मीटर रुंदी आणि ११ मीटर खोलीचा हा शेत तलाव कोकणातील सर्वात मोठा तलाव ठरला आहे. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या अमृतसरोवर तलावाचे ऑनलाइन पद्धतीने उद्घाटन झाले. शेततळयासाठी १४ लाख ७५ हजार रुपये खर्च आला आणि त्यापैकी ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून मिळाले.
केवळ पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाच्या थेंबातून या शेततळ्यात सुमारे दीड ते दोन कोटी लिटर

### कृषी पर्यटन केंद्र सुरू

अशोक साळुंखे यांनी आता प्रगतीची दिशा कृषी अनुदानावर पॉवर टिलर, ट्रॅक्टर, रोटा व्हेटर, ग्रास कटर, ठिबक सिंचन, पॅक हाऊस अशी विविध यंत्रणा उपलब्ध करून घेतली आहे. गतवर्षी रत्नागिरी येथे झालेल्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या हस्ते त्यांना पॉवर टिलर सन्मानपूर्वक देण्यात आला. तो घेताना आपणास अभिमान वाटला असे ते सांगतात

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान


अशोक साळुंखे यांच्या कृषी पर्यटन क्षेत्रातील या कार्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्तीशः दखल घेऊन त्यांना वर्षा बंगल्यावर निमंत्रित करून सन्मान केला. राज्याचे उद्योगमंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी देखील कोकणातील उजाड माळरानावर नंदनवन फुलविणाऱ्या या किमयागाराचे आणि साळुंखे परिवाराचे अभिनंदन केले आहे. वेतोशीचा हा एकात्मिक कृषी प्रकल्प कोकणातील पुढील पिढीला दिशादर्शक ठरेल यात शंका नाही. अशोक साळुंखे यांचा संपर्क मोबाईल क्रमांक ९४२२०५४१९९, ७०५७५५५५१७ असा आहे.

लेखक : प्रभाकर कासेकर
निवृत्त माहिती अधिकारी
मो. ९४२२०५४०३४*

# असेही जिल्हाधिकारी

**निवडणूक म्हटली की, मतदान आणि निकाल हे दोनच दिवस सर्वसामान्यांसाठी महत्वाचे असतात, परंतु या निवडणूकीसाठी संपूर्ण यंत्रणा ही वर्षभरापासून तयारी करत असते. मुख्य निवडणूक आयोग ते जिल्हाधिकारी सर्वच प्रशासकीय अधिकारी या निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी मेहनत घेत असतात.. जिल्हाधिकारी म्हणून काम करत असताना आपल्या अखत्यारित येणाऱ्या जिल्हे, त्यातील मतदारसंघ, मतदान केंद्र, मतमोजणी केंद्र या सर्व बाबींची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची असते, या सर्व धावपळीत जेव्हा आपला अधिकारी रुग्णालयात दाखल होतो, त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना सलाम असे जिल्हाधिकारी ठाण्यात आहे ही निश्चितच ठाणेकरांसाठी देखील अभिमानाची बाब आहे.**





निवडणूक म्हटली की, मतदान आणि निकाल हे दोनच दिवस सर्वसामान्यांसाठी महत्वाचे असतात, परंतु या निवडणूकीसाठी संपूर्ण यंत्रणा ही वर्षभरापासून तयारी करत असते. मुख्य निवडणूक आयोग ते जिल्हाधिकारी सर्वच प्रशासकीय अधिकारी या निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी मेहनत घेत असतात.. जिल्हाधिकारी म्हणून काम करत असताना आपल्या अखत्यारित येणाऱ्या जिल्हे, त्यातील मतदारसंघ, मतदान केंद्र, मतमोजणी केंद्र या सर्व बाबींची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची असते, या सर्व धावपळीत जेव्हा आपला अधिकारी रुग्णालयात दाखल होतो, त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना सलाम असे जिल्हाधिकारी ठाण्यात आहे ही निश्चितच ठाणेकरांसाठी देखील अभिमानाची बाब आहे.
२५ ठाणे लोकसभा मतदारसंघाची निवडणूक २० मे रोजी पार पाडली. त्यानंतर प्रशासनाची मतमोजणीची तयारी सुरू झाली. याच दरम्यान जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयात दाखल करावे लागले. ३१ मे रोजी सायंकाळी ते रुग्णालयात दाखल झाले, डॉक्टरांनी सर्व प्राथमिक चाचण्या केल्यानंतर त्यांच्यावर शस्त्रक्रिया करावी लागेल असे सांगितले. शुक्रवारी रात्री सानप कुटुंबीय रुग्णालयात दाखल झाले, त्याचवेळी आमच्या टीममधील ज्येष्ठ पत्रकार यांनाा याची कल्पना आम्ही दिली. त्यांनी तात्काळ जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना मनोज सानप रुग्णालयात दाखल असल्याची माहिती दिली. सरांनी त्यांची सर्व चौकशी केली, त्याच दिवशी रात्री १२.३० वा. स्वत: जिल्हाधिकारी रुग्णालयात आले, त्यांनी सानप यांच्यावर शस्त्रक्रिया करणारे नामवंत हृदयरोगतज्ज्ञ डॉ. विजय सुरासे यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी मनोज सानप यांची भेट घेतली आणि त्यांना एकच सांगितले. त्यांचे हे वाक्य सानपांना उर्जा दणारे, बळ देणारे होते. त्यांच्या डोक्यावरुन मायेने हात फिरविला.. हा क्षण सर्वांनाच थक्क करणारा होता. रुग्णालयातील उपस्थित डॉक्टर्स, कर्मचारी, सानप यांचे कुटुंबीय सारेच अवाक् झाले. आयएएस अधिकारी जेव्हा आपल्या अधिकाऱ्यासाठी धावून येतात, त्यांच्या कुटुंबियांना धीर देतात हा क्षण सानप कुटुंबियांसाठी लाख मोलाचा होता हे त्यांच्याकडे पाहून जाणवत होते. रात्री एक वाजेपर्यत स्वत: अशोक शिनगारे साहेब हे थांबले होते प्रशासनप्रमुख जेव्हा कुटुंबप्रमुख म्हणून आपल्या अधिकाऱ्याला भेटायला जातात तेव्हा त्यांच्याप्रती असलेले प्रेम, आपुलकी, जिव्हाळा तर दिसून येतोच पण एक प्रेमळ माणूस सुद्धा अनुभवयाला मिळतो.
१ जून रोजी मनोप सानप यांच्यावर स्टेन न टाकता यशस्वी शस्त्रक्रिया झाली.. तेव्हाही अशोक शिनगारे सर हे रुग्णालयाच्या संपर्कात राहून सतत चौकशी करीत होते. त्याच दिवशी ठाण्यातील मतमोजणी केंद्रावर सकाळी त्यांनी पाहणी केली. मतमोजणी केंद्राची पाहणी झाल्यानंतर त्यांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना सानप यांची माहिती दिली, त्यावेळी त्या ठिकाणी उपस्थित असलेले कर्मचाऱ्यांनाही धक्का बसला तो धक्का हा होता की कलेक्टर सरांना एवढी माहिती कशी.. जेव्हा ते म्हणाले मी रात्री भेटून आलो.. त्यांना सांगून आलो की कामाचे टेन्शन घेवू नका.. फक्त आनंदी रहा.. हे त्यांचे शब्द उपस्थीत असलेल्या आम्हा सर्वांनाही एक वेगळी उर्जा देवून गेले.
हे लिहण्याचा प्रपंच म्हणजे सरकारी अधिकारी, कर्मचारी यांच्याबद्दल नेहमी सर्वसामान्यांमध्ये गैरसमजुतीची भावना असते. सरकारी काम आणि सहा महिने थांब ही पूर्वापार चालत असलेली म्हण आज देखील लोक सर्रास वापरतात..पण आज काळ बदलला आहे, सरकारी यंत्रणाही तितक्याच तत्परतेने नागरिकांना सेवा देतात. निवडणूकीच्या वातावरणात विविध गोष्टींचा ताण अजिबात न दाखवता सर्व अधिकारी, कर्मचारी यांना विश्वासात घेवून निवडणूकीची सर्व प्रक्रिया त्यांनी शांततापूर्ण वातावरणात पार पाडली.. मनोप सानप यांना रुग्णालयात जावून धीर दिला.. त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधला.. काही लागले तरी मी आहे हे धीराचे शब्द दिले.. आजारी असलेल्या रुग्णाला आणखी काय हवे असते कुटुंब तर सोबत असतेच पण आपले प्रशासनप्रमुख आपल्या पाठीशी आहेत हीच भावना सुखावणारी.. आणि पुन्हा नव्या उत्साहात उभे राहण्यासाठी बळ देणारी आहे, हे एवढे मात्र निश्चिगतच ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे सरांसारखे अधिकारी हे प्रत्येक आस्थापनेत असतील तर एखादा आजारी कर्मचारी देखील पुन्हा नव्या जोमाने कामास सुरूवात करेल यात शंका नाही.

-प्राची प्रशांत डिंगणकर
उपमाहिती जनसंपर्क अधिकारी (प्र.)
ठाणे महानगरपालिका ठाणे

# महाराष्ट्र शिक्षण क्रांती संघटनेचा आ. निरंजन डावखरे यांना पाठिंबा



ठाणे : महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटनेच्या कोकण विभाग कार्यकारिणीच्या झालेल्या बैठकीत कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार व संघटनेचे सल्लागार निरंजन डावखरे यांना पाठिंबा देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला, अशी माहिती संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष रमेश निवृत्ती जाधव यांनी दिली.

शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस, कोषाध्यक्ष देविदास नरवाडे, विभाग सचिव ज्ञानेश्वर गोसावी, राज्य कार्यकारिणी सदस्य एस. जी पाटील, विभागाचे पदाधिकारी, सर्व जिल्हाध्यक्ष आणि सचिव सभेवेळी उपस्थित होते.

गेल्या १२ वर्षांपासून आमदार निरंजन डावखरे हे १२ वर्षांपासून पदवीधर आमदार असून शिक्षण क्रांती संघटनेचे सल्लागार आहेत. संघटनेच्या शासकीय दप्तरी कामांकरिता त्यांचे सातत्याने सहकार्य लाभत असून, त्यांना विभागातील समस्यांची संपूर्णपणे जाण आहे, असे नमूद करीत शिक्षण क्रांती संघटना पूर्ण ताकदीनिशी डावखरेंसोबत राहणार असल्याचे राज्याध्यक्ष सुधीर घागस यांनी सांगितले.

इंग्रजी माध्यमांच्या विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सोडवणे. तसेच सर्वांना जुनी पेन्शन लागू करण्यासाठी महालढा उभारणे आदींकडे संघटना अधिक लक्ष देणार असल्याचे सभेत ठरविण्यात आले, असे घागस यांनी सांगितले. या वेळी उत्तम कांबळे, महेंद्र जाधव, डॉ. शहाजहान मौलना, राजेंद्र गवळी, सुरेश साळवे, संदेश पाटील, योगेश वल्लाळ, थॉमस शिनगारे, प्रशांत घागस, किशोर राठोड, अनिल मुरादे, प्रा. रमेश बुटेरे, सुरेंद्रनाथ दुसाने आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## बेलापूर विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ए विभाग कार्यालयांतर्गत बेलापूर, सेक्टर १९, श्री सखूभाई कोळी घर क्रमांक ४९४ व रघुनाथ कोळी घर क्रमांक ४९५/४९६ यांनी केलेले बांधकाम आज दिनांक ०८ जुन रोजी पुनश्च हटविण्यात आले. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे आदेशान्वये व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनानुसार ए विभाग कार्यालयाचे सहा. आयुक्त शशिकांत तांडेल, यांच्या नियंत्रणाखाली सदरचे बांधकाम पुनश्च हटविण्यात आले. या धडक मोहिमेसाठी उप अभियंता (प्रभारी) रोहित ठाकरे, कनिष्ठ अभियंता मयुरेश पवार, वरीष्ठ लिपिक स्वप्निल तारमळे, उपस्थित होते सदर कारवाई साठी १ पोकलन, १२ मजूर, १ पिकअप ई. साहित्य सामुग्री वापरण्यात आली होती. यापुढे अशाच मोहिमा तीव्र करण्यात येणार आहेत.




'सील आश्रम' पनवेल ही संस्था रस्त्यावर/फुटपाथवर राहणारे बेवारस, आजारी, जखमी, वेडसर, मुकबधीर (भिकारी वगळुन) १८ वर्षावरील पुरुष व महिला यांना ताब्यात घेऊन उपचार करून पुर्नवसन करण्याचे सामाजिक कार्य करत आहेत .ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रातील रूग्णांना घेवून जाणेसाठी या संस्थेने ठाणे पोलिसांना रुग्णवाहिका दिल्या आहेत या रुग्णवाहिकेचे उद्घाटन अतिरिक्त पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या हस्ते झाले. यावेळी पोलीस अधिकारी व सील आश्रमचे पदाधिकारी उपस्थित होते. (छाया : मनोज सिंह)

१५ जून रोजी ज्येष्ठ नागरिक छळ प्रतिबंधक जनजागृती दिनी

## कुवारबाव ज्येष्ठ नागरिक संघातर्फे विशेष मेळावा

रत्नागिरी : अलीकडच्या काळात कुटुंब व्यवस्थेत फार मोठे बदल झालेले असून विभक्त कुटुंब पद्धती अधिक वाढली आहे. ज्येष्ठ नागरिक त्यांच्या जीवनातील अनुभव आणि ज्ञान लक्षात घेता समाज उपयोगी घटक म्हणून त्यांना राष्ट्राची संपत्ती मानली जाते. त्यांचा राष्ट्र उभारणीच्या कामात उपयोग करून घेता यावा म्हणून शासनाने ज्येष्ठ नागरिकांसाठी नवीन धोरण अमलात आणले आहे. मात्र विभक्त कुटुंब पद्धतीमुळे कुटुंबाची व्याख्याच बदलून गेली असून राजा राणीच्या संसारात मुलांना आई-वडिलांची अडचण वाटू लागली आहे. परिणामी समाजातील सुमारे ९५% ज्येष्ठ नागरिकांना उतार वयात मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. ज्येष्ठ नागरिकांसमोर अनेक समस्या उभ्या राहिल्या आहेत.

समाजातील बदलांमुळे ज्येष्ठांच्या कौटुंबिक समस्या ही वाढत आहेत. त्या दूर करण्यासाठी जेष्ठ नागरिक संघामार्फत ज्येष्ठ नागरिक छळ प्रतिबंधक म्हणजेच ज्येष्ठ नागरिक अवहेलना प्रतिबंधक जनजागृती दिवस १५ जून रोजी साजरा करून ज्येष्ठांच्या कल्याणकारी कायद्याचा प्रचार आणि प्रसारासाठी कटिबद्ध झाले आहेत. या दृष्टिकोनातून रत्नागिरी तालुक्यातील कुवारबाव परिसर संघाच्या वतीने शनिवार दिनांक १५ जून २०२४ रोजी सायंकाळी चार वाजता कुवारबाव येथे ज्येष्ठ नागरिक भवनात जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात रत्नागिरी येथील मानवी हक्कांची जाणीव ठेवून सुमारे २४ वर्षे सामाजिक कार्य करणाऱ्या स्वयंसेतू या सामाजिक स्वयंसेवी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्ष श्रीमती श्रद्धा कळंबटे या ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीने समाजप्रबोधन पर मार्गदर्शन करणार आहेत. त्याचप्रमाणे पोलीस खात्याच्या अधिकाऱ्यांनाही यावेळी मार्गदर्शनासाठी निमंत्रित करण्यात आले आहे.

# अनधिकृत माध्यमिक शाळेत प्रवेश घेऊ नका

शिक्षणाधिकारी माध्यमिक ललीता दहितुले

### २३ शाळा बंद, ०१ अनधिकृत शाळा सुरू

ठाणे (गणेश भोईटे): ठाणे जिल्ह्यात एकूण २४ माध्यमिक शाळा अनधिकृतपणे सुरू होत्या त्यापैकी २३ शाळा बंद केल्या असून सद्यस्थितीत ०१ अनधिकृत शाळा सुरू आहे. या ०१ अनधिकृत शाळेवर एफ.आय.आर दाखल करण्यात आला आहे. पुढील शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता या अनधिकृत शाळेत प्रवेश घेऊ नये असे आवाहन शिक्षणाधिकारी माध्यमिक ललीता दहितुले यांनी केले आहे.

*ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत शाळांची यादी प्रकाशित करण्यामागे हाच उद्देश आहे कि पालकांनी पाल्याचे माध्यमिक शाळेत प्रवेश घेताना अनधिकृत शाळेत प्रवेश घेऊ नये. पालकांनी अधिक माहिती घेऊनच पाल्याचे शाळेत प्रवेश निश्चित करावे* – ***शिक्षणाधिकारी माध्यमिक ललीता दहितुले***

### जिल्ह्यात अनधिकृत शाळाची यादी

१. स्टार इंग्लिश हायस्कुल, दिवा, ठाणे मनपा क्षेत्र,
२. डिवाईन ग्रेस हायस्कुल, वज्रेश्वरी ता. भिवंडी जि. ठाणे,
३. आर एन इंग्लिश स्कूल कोन गाव भिवंडी ठाणे,
४. फरान इंग्लिश मिडीअम स्कुल,गौरीपाडा, भिवंडी जि.ठाणे,
५. आरंभ इंग्लिश स्कुल श्री, गणेश नगर चौळ गणेश मंदिराचे मागे दिवा आगासन रोड दिवापुर्व,
६. न्यु गुरुकुल कॉन्व्हेंट स्कुल श्लोकनगर दातिवली रोड दिवा पुर्व ४००६०२,
७. ग्रीन व्हॅली कॉन्व्हेंट स्कुल,शिवसर्थ अपार्ट सदगुर नगर, दिवा आगासन दिवा जि.ठाणे,
८. एस. एस. इंग्लिश स्कुल बाबुराव रेसिडेंन्सी हनुमान मंदिर निअर दिवा,
९. आर एल पी हायस्कुल शिवम अपार्ट मुंब्रादेवी कॉलनी दिवा,
१०. आदर्श गुरुकुल स्कुल निअर जिव्हाळा हॉल दिवा इंग्रजी,
११. आदर्श गुरुकुल स्कुल वैभव ढाब्यासमोर दिवा शिळ रोड दिवा पुर्व माध्यम मराठी,
१२. आदर्श गुरुकुल स्कुल वैभव ढाब्यासमोर दिवा शिळ रोड दिवा पुर्व माध्यम इंग्रजी,
१३. एस आर पी इंग्लिश स्कुल वक्रतुंडनगर दिवा,
१४. ओमसाई इंग्लिश स्कुल, दातिवली रोड दिवा जि.ठाणे,
१५. श्री. विद्याज्योती इंग्लिश स्कुल,नारायण कॉम्पलेस्क मुंब्रादेवी कॉलनी रोड मुंब्रा जि.ठाणे,
१६. सिम्बॉयसिस स्कूल, सुंदरबन नगर, दातिवली रोड दिवा,
१७. केम्ब्रीज इंग्लिश स्कूल, मानसी कॉम्प्लेक्स भोलेनाथ मुंब्रादेवी कॉलनी रोड मुंब्रा जि.ठाणे,
१८. पब्लीक इंग्लिश स्कुल, गणेशपाडा दातिवली दिवा,
१९. आर्य गुरुकुल इंग्लिश स्कुल दातिवली रोड दिवा,
२०. श्रीराम कृष्णा इंग्लिाश स्कुल, दिवा दातिवली रोड दिवा,
२१. स्मार्ट एज्युकेशन इंग्लिश स्कु मुंब्रा,
२२. जे डी इंग्लिश स्कुल फेस २ श्लोक नगर मुंब्रा जि.ठाणे,
२३. भारत इंग्लिश स्कुल गुरु कृपा अपार्ट सिध्दीविनायक नगर दिवा

**अनधिकृत सुरू असलेली माध्यमिक शाळा**
१. अल मुनीहाज सेकंडरी हायस्कुल, बेलापूर, नवी मुंबई

## जिल्हा परिषद कृषि विभागाकडून खरीप हंगामाचे नियोजन

ठाणे : जिल्हा परिषद कृषि विभागाकडून खरीप हंगामाचे नियोजन करण्यासाठी बियाची मागणी करण्यात आली असून नियंत्रण कक्ष, तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती, भरारी पथकांची स्थापना करून शेतकरी बांधवांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी ठाणे जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. ठाणे जिल्ह्यात खरीप हंगामाखालील सरासरी क्षेत्र ६०,००० हेक्टर एवढे असून त्यापैकी भात पिकाखालील सरासरी क्षेत्र ५६,००० हेक्टर आहे. मागील खरीप हंगामामध्ये ५३,७४२ हेक्टर क्षेत्रावर भात पिकाची पेरणी झाली होती. यावर्षी ५५,००० हेक्टर क्षेत्रावर भात पिकाची लागवडीचे नियोजन आहे. त्यासाठी कृषि विभागाने शासनाकडे ११,११० मे.टन रासायनिक खातंची मागणी करण्यात आली होती. शासनाने ठाणे जिल्ह्यासाठी १०,००० मे.टन खतांचा साठा मंजूर करून दिला आहे. त्यापैकी ७,९०० मे.टन युरीया खताचा वाटा आहे. शेतकऱ्यांकडून युरीया खतांची मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यांसाठी एकूण २२,००० क्विंटल भात बियाण्यांची गरज असून ४५% बियाणे बदल गृहित धरुन ९,९०० क्विंटल भात बियाण्यांची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. त्यापैकी २,२०० क्विंटल महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाकडील बियाणे असून ७,७०० क्विंटल बियाणे खाजगी बियाणे उत्पादक कंपन्या पुरविणार आहेत.




आमदार प्रताप सरनाईक यांना ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांना भेटून ठाण्यातील विविध समस्य बाबत चर्चा केली यावेळी महापालिका अधिकारी उपस्तित होते. (छाया : मनोज सिंह)



ठाण्यातील चंदनवाडी विभागातील तरुणीची दिशा रवींद्र कदम हीने एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा पटकावला बहुमान. आम. संजय केळकर यांनी दिशा व त्यांच्या आई वडील यांचे अभिनंदन केले.

## मिरा भाईंदर पालिकेतर्फे सीसी रोडचे काम प्रगतीपथावर



भाईंदर : मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिका तसेच एमएमआरडीए च्या माध्यमातून शहरातील बहुतांश ठिकाणी सीसी रोडचे कार्य प्रगतीपथावर आहे. शहरातील सर्व रस्ते नागरिकांना वाहतुकीसाठी सोयीस्कर करण्यासाठी महापालिकेचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी शहरात सुरू असलेल्या सर्व रस्त्यांच्या कामाची पाहणी केली. घोडबंदर येथील अदाणी पॉवर हाऊस येथील रस्त्याची आयुक्त यांनी पाहणी केली असता सदर रस्त्यावर नागरिकांना वाहतुकीसाठी अडचण होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. रस्त्यावरील एक बाजू ही सीसी स्वरूपात असून उर्वरित बाजूचे काम सुरू होते. आयुक्त यांनी तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता व कनिष्ठ अभियंत्यांना सदर रस्ता हा तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्त करून करण्याचे निर्देश दिले. आयुक्त यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने २४ तासांच्या आत सदर रस्त्यावर खडी व रोड रोलरच्या साहाय्याने तात्पुरत्या स्वरूपात वाहतुकीसाठी रस्त्याचे कार्य पूर्ण केलेले आहे. सदर रस्ता सीसी रस्त्यामध्ये लवकरात लवकर पूर्ण करण्याचे कार्य महानगरपालिका करणार आहे.







फी भरली नाही म्हणून शाळेतील ११२ विद्यार्थ्यांना शाळेने बाहेर काढल्याचा प्रकार ठाणे पोलीस स्कुल मध्ये घडला आहे. याविरोधात युवा सेनेने शाळा प्रशासनाला धारेवर धरून मुख्याध्यापिका यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. (छाया : मनोज सिंह) **(सविस्तर वृत्त पान १ वर)**




राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) च्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे २५व्या वर्धापन दिन ठाण्यात साजरी करण्यात आले यावेळी ठाणे शहरजिल्हा अध्यक्ष आनंद परांजपे यांनी पक्षाचा झेंडा फडकवण्यात आले. (छाया : मनोज सिंह)

## स्व. मुकुंद केणी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्र्या वाटप

कळवा : कळवा परिसरातील दिवंगत समाजसेवक लोकनायक कार्यसम्राट स्वर्गीयः मुकुंद केणी यांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त सालाबाद प्रमाणे प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांना मोफत सत्या वाटप कार्यक्रम दिः १०/०६/२०२४ रोजी राष्ट्रवादी जनसंपर्क कार्यालय बुधाजी नगर येथे संपन्न झाला ४,००० ते ५,००० हजार नागरिकांना श्रीमती प्रमिलाताई मुकुंद केणी मंदार मुकुंद केणी यांच्या हस्ते छत्र्या वाटप करण्यात आल्या.

याप्रसंगी प्रमिलाताई म्हणाला की, गेले पंधरा वर्षे सातत्याने स्वर्गीय मुकुंद केणी यांनी प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांना छत्र्या वाटप संकल्पना राबवली असून त्यांच्या पश्चात मंदार केणी व मयूर केणी हे सामाजिक काम करत आहे त्या व्यतिरिक्त ज्येष्ठ नागरिकांसाठी ठाणे महानगरपालिकेच्या योजना पेन्शन धारक ज्येष्ठ नागरिकांचे समस्या निवारण करणे पोस्टाच्या स्कीम ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिर अध्यात्मक कार्यक्रमाचे आयोजन सातत्याने करत आहे



'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१